**विशेष पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ**

दिनांक २०/०३/२०२३

# पोलीस स्टेशन अवधुतवाडी यांची विषेश कामगीरी

## बायपास रोडवर जबरी चोरी व दुखापत करणारे आरोपींना डि.बी. पथक व मोटर सायकल चार्ली चे अंमलदार यांचेकडुन अटक

यवतमाळ शहरात वाढलेल्या गुन्हेगारीवर आळा घालने करीता मोटर सायकल चार्ली पथक पेट्रोलींग करीता तयार करण्यात आले असुन यवतमाळ शहरात सदर चार्ली पेट्रोलींग अंमलदार यांचेकडुन विविध भागामध्ये पेट्रोलींग करून घेण्यात येते. त्यामुळे यवतमाळ शहरात घडनाऱ्या यवतमाळ मध्ये सायंकाळी घराबाहेर काही कामा निमीत्त येणाऱ्या महीलांचे गळयातील मंगळसुत्र हिसकावुन नेणारे तसेच दखलपात्र,अदखलपात्र गुन्हयांना आळा बसावा तसेच गुन्हेगारांवर वचक निर्माण होणेकरीता यवतमाळ शहरात चार्ली पथक सुरू करण्यात आले आहे.

दि. १९/०३/२०२३ रोजी सांयकाळी ०५/३० वा. चे सुमारास एका मोटर सायकलवर मुलगा व मुलगी हे गोधणी बायपास ने पावर हाउस चे जवळ यवतमाळ ते आर्णी जाणारे रोडचे बाजुला रोडपासुन थोडया अंतरावर एका मुलीला एक इसम थांबवुन दिसल्यावरून गोधणी बायपास ने पेट्रोलींग करीत असलेले चार्ली अंमलदार व पोलीस स्टेशन अवधुतवाडी येथील डि.बी पथकातील अंमलदार यांचे निदर्शनास येताच सदर ठिकाणी जाउन पाहीले असता चार्ली व डि.बी पथकाची गाडी पाहुन एक इसम हा पळुन गेला. त्यावरून पोलीस स्टेशन अवधुतवाडी येथील डि.बी पथकातील अंमलदार यांनी त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेउन त्या ठिकाणी उभी असलेल्या मुलीस विचारपुस केली असता नमुद पळुन जाणारा ईसम व त्याचे साथीदार यांनी तिचे सोबत आलेल्या तिच्या मित्राला व तिला मारहान करून तिचे जवळील १००० रू. बळजबरीने हिसकावुन घेतल्याचे सांगीतले. त्यावरून नमुद इसमास डि. बी. पथकाने ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन अवधुतवाडी येथे आणले असता त्याने व त्याचे मित्रांने रोडचे बाजुला जगंलातील झुडपात बसुन असलेल्या फिर्यादी व तिचे मित्राचा व्हिडीओ तयार करून त्यांना पोलीस असल्याचे सांगुन त्यांचेकडुन पैसे घेतल्याचे त्याने कबुल केले. वरून फिर्यादी मुलगी हिची फिर्यादी प्रमाणे आरोपी नामे शेख वसिम शेख रसुल,वय २१ वर्ष,रा. खासबे प्लॉट नेर याचेवर व त्याचे सोबत असलेल्या दोन साथीदारांवर पो.स्टे. अवधुतवाडी येथे अप क्र. ४०७/२०२३ क. ३९४,३२३,५०४,५०६,३४ भादंवि. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. त्यावरून नमुद आरोपी शेख वसिम शेख रसुल यास विचारपुस केली असता त्याचे सोबत त्याचे मित्र शेख निसार शेख निजाम,वय २४ वर्ष,रा. हनुमान नगर नेरे हा असल्याचे सांगीतले. त्यानंतर डि.बी.पथकाने आरोपी शेख निसार शेख निजाम,रा.नेर यास नेर येथुन ताब्यात घेतल्यावर फोन वर पोलीस असल्याचे सांगणारा इसम नामे कौसर बेग सुभान बेग,वय २१ वर्ष,रा.हनुमान नगर नेर हा असल्याचे सांगीतले वरून कौसर बेग सुभान बेग यास सुध्दा डि.बी.पथकाने गुन्हयाचे तपास कामी विचारपुस करणे करीता ताब्यात घेतले. त्यावरून नमुद आरोपींनी फिर्यादी व तिचे मित्राचा व्हिडीओ काढुन त्यांना पोलीस असल्याचे सांगुन फिर्यादी हिचेकडुन १००० रू. जबरीने हिसकावुन घेवुन वसिम शेख व निसार शेख यांनी घेतल्याचे कबुल केले. वरून सदर गुन्हयाचा तपास सुरू असुन नमुद गुन्हयात असलेले सर्व आरोपी पोलीस स्टेशन अवधुतवाडी येथील डि. बी पथकाने तात्काळ अटक करून चार्ली व डि.बी पथकातील अमंलदार यांनी मोठा गुन्हा घडण्यास प्रतिबंध घतला आहे. पुढील तपास सुरू आहे.

सदर गुन्हयाच्या तपासाची कामगिरी डॉ. पवन बनसोड, पोलीस अधिक्षक,यवतमाळ, श्री पियुष जगताप, अपर पोलीस अधिक्षक यवतमाळ, श्री. संपत भोसले, उपविभागीय पोलीस अधिक्षक यवतमाळ, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मनोज केदारे,प्रभारी ठाणेदार श्री.धिरेंद्रसिंग बिलवाल, पोहवा/सुरेश मेश्राम,गजानन वाठमोडे,पोना/बलराम शुक्ला,आशिष भुसारी,रूपेश ढोबळे,पोशि/धनंजय पोटपल्लीवार, बबलु पठाण,प्रशांत राठोड **चार्ली अंमलदार** पोशि/शाम दवंडे, पवन भुरके, ड्रा.पोना/कमलेश महाजन यांचे पथकाने यशस्वीरित्या पार पाडली आहे.

( शुभांगी गव्हाने )